१९८-शिरूर हवेली विधानसभा मतदार संघ निवडणुक २०१९

**अपक्ष उमेदवार :-श्री.सुधीरजी रामलाल पुंगलिया वय: ६७ वर्षे,**

(ओशो अनुयायी, लेखक, प्रकाशक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ता )




निष्णात सिव्हिल इंजिनिअर १९७३ (लायसेन्सड), एक अष्टपैलू व्यक्तीमत्व
जमीन मिळकती व्यवसायिक व संबंधित बाबतीतील जाणकार.
'मनिषा महाल', नगर रोड, वाघोली, ९८२२०१३३९८ sudhirpungaliya@gmail.com




रोड रोलर

## रोड रोलर च्या समोरील बटण दाबा

## श्री. सुधीर पुंगलिया यांनाच विजयी करा



सरकारी खात्याच्या व कोर्टाच्या बेजबाबदार व प्रलंबित कार्य पध्दतीमुळे लोकांचा बहुमुल्य वेळ योग्य निर्णय मिळण्याच्या प्रतिक्षेत अनेक वर्षे वाया जातो, लाखो रुपये खर्च होतात व मानसिक आणि शारिरीक छळ होतो. हे सर्व तज्ञांना माहित असून सुध्दा कोणीही प्रचलित कायद्यात व कार्य प्रणालीत बदल करीत नाहीत ही अत्यंत खेदजनक व अमानवीय घटना आहे आणि त्यामुळे भारताची घटना ही जरी सर्व राष्ट्रांमध्ये खुप सविस्तर  व मोठी असली तरी जो प्रकार वर्षानुवर्षे चालला आहे तो भारताच्या घटनेच्या पुर्णपणे विरोधात आहे. जगात कोणाच्याही जीवनाशी कोणत्याही प्रकारे खेळायचा कोणालाही अधिकार दिला जाऊ शकत नाही व कोणीही कोणाचेही जीवन अकारण उध्वस्त करु शकत नाही. त्यामुळे सर्व कायदे हे मानवता व जबाबदारपणाला धरूनच असणे अत्यंत आवश्यक आहे.

माझा ५० वर्षांचा जमिनीच्या, टिंबर इंडस्ट्री व प्रकाशनाच्या व्यवसायातील प्रदिर्घ  अनुभवामुळे माझा अनेक सरकारी खात्यांशी व कोर्ट कचे-यांशी जवळून संबंध आला आहे. त्यामुळे अनेक दृष्टीने सर्व प्रकारच्या व्यवसायात लोकांचे कसे हाल होतात याची मला पुर्ण कल्पना आहे. मी अनेक वर्षांपासून कोर्टांना, मंत्र्यांना, राष्ट्रपतींना नवीन कायदे व कार्य पध्दती सुचवून सुध्दा त्याची कोणीही दखल न घेतल्यामुळे आज भारताची परिस्थिती सर्व दृष्टीने बिकट झाली आहे. भारतातील करोडों लोकांच्या त्रासासाठी आज पर्यंतचे सर्व कायदेमंत्री जास्त जबाबदार आहेत. लोकांच्या प्रेमापोटी व सामाजिक बांधीलकी लक्षात घेवून मी अनेक क्षेत्रासाठी नवीन कायदे प्रणालीचे पुस्तक "सुधीर निती" लवकरच प्रकाशित करीत आहे. सरकार कडून व कोर्टाकडून जर वेळीच न्याय मिळत गेला असता तर अनेक क्षेत्रात मी व अनेकांनी मोठे प्रोजेक्ट केले असते व लाखो लोकांना रोजगार उपलब्ध झाला असता. माझ्या सारख्या अनेक तज्ञ व अनुभवी माणसांचा अनादर करण्यात संपूर्ण भारताचे खुप मोठे नुकसान आहे. माझ्या सारख्या संत माणसाचा अनेक प्रकारे छळ केला गेला आहे व मला व माझ्या वडिलांना जो लोकांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी अनेक एकर जागेत मोठा ध्यान साधना आश्रम करावयाचा होता तो आम्ही करु शकलो नाहीत त्यामळे मानवजातीचे खुप मोठे नुकसान झाले आहे. **रस्ते, वीज, पाणी, कचरा, वृक्ष, घरे व इतर महत्वाचे विषय मी हाताळीत आहे.**

**– सुधीर पुंगलिया – संत सुधीर – A Man of Law & Justice.** (facebook as --- Sudhir Pungaliya)

**संधी मिळाल्यास २४ हजार कोटी रूपयांत भारतात १०० मेडिकल कॉलेजेस व पुणे शहराचा रिंग रोड हे सर्व दोन वर्षात पुर्ण करून देऊ शकतो . ( संदर्भ :दि. २९/०८/२०१९ रोजीची वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली बातमी ) पी.एम.आर.डी.ए. कडे पुण्याच्या रिंग रोड व रस्ते रूंदीकरणासाठी पैसे नसल्याने अत्यावश्यक कामे झाली नाहीत.**

तज्ञांच्या समितीवर किंवा शासकीय दरबारी मला महत्वाचे स्थान दिले असते तर रिंग रोड अनेक वर्षे आधीच पुर्ण करून दिला असता व पुण्यातील सर्व रस्ते नियोजनाप्रमाणे विकसीत करून दिले असते तसेच लाखों लोकांसाठी पुण्याच्या सर्व बाजूस छोटया घरांसाठी व्यवस्थित आराखडे तयार करून प्लॉट उपलब्ध करून दिले असते व त्यामुळे बेकायदेशीर बांधकामे झाली नसती व वाहतुक कोंडीच्या समस्या निर्माण झाल्या नसत्या.

**मतदान: दिनांक २१ ऑक्टोबर २०१९ सकाळी ७:00 ते सायंकाळी ६:00 वाजेपर्यंत  चिन्ह: रोड रोलर**

## अनेक महत्वाची कामे प्रलंबीत व लोकांचे खुप हाल, आता खरंच गरज जबाबदार आणि अनेक क्षेत्रात जाणकाराची, झपाटयाने काम करणाऱ्या सुशिक्षीत नेतृत्वाची.


मुद्रक: ज्ञानेश्वरी ऑफसेट प्रिंटर्स प्रती - १२000


**१९८-शिरूर हवेली विधानसभा मतदार संघ निवडणुक २०१९ चे अनुभवी अपक्ष उमेदवार**

**श्री.सुधीरजी रामलाल पुंगलिया (एक अष्टपैलू व्यक्तीमत्व)**

(ओशो अनुयायी, लेखक, प्रकाशक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ता )


'मनिषा महाल', नगर रोड, वाघोली, ९८२२०१३३९८ sudhirpungaliya@gmail.com


- सदर मतदार संघात सन १९८० पासून जमिन मिळकतीचा व्यवसाय, कायदेशीर अभ्यास व लोकांना मार्गदर्शन.
- लाकडी व कौलारू घरांसाठी मजबुत व टिकाऊ ऐन, शिसम, सागवान वगैरे लाकूड देणारी सुप्रसिध्द सॉ मिल इंडस्ट्री (१९४७-९४).
- लायसेन्सड सिव्हील इंजिनिअर (१९७३) - लोकांना कमी बजेट मध्ये योग्य मटेरिअल वापरून इमारती/घरे बनविण्यासाठी सल्ला. तसेच भारतातील कोणत्याही शहराच्या चांगल्या नगररचना नियोजनासाठी व विकासासाठी नगर नियोजनकार म्हणून कामे करण्याची क्षमता.
- नगररचना, महसूल खाते, मोजणी खाते, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण- पी.एम.आर.डी.ए. यांचे बरोबर अनेक वर्षांपासून बराच पत्रव्यवहार केला व लोकांना होणा-या त्रासाबद्दल अनेक नवीन उपाययोजना व कायदे सुचविले.
- पंधरा वर्षांआधी 'गुंठेवारी-नगररचना आणि बेकायदेशीर बांधकामे' यावर माझे विचार लिहून पुस्तक प्रकाशित केले. परंतु त्याची दखल न घेतल्यामुळे हजारो बेकायदेशीर बांधकामे झाली व वाहतुक व्यवस्था कोलमडली.
- अनेक शैक्षणिक संस्थांना व सामाजिक संस्थांना मदत केली.
- रतनबाई रामलालजी पुंगलिया हेल्थ केअर सेंटर हे मल्टी-स्पेशालिटी  हॉस्पिटल बांधले.
- जिल्हा परिषद निवडणुक २००७ आणि विधानसभा निवडणुक २०१४ अशा दोन निवडणुका लढविल्या. निवडणुक आयोग व त्यांची कार्यपध्दती सदोष असल्यामुळे कष्ट अनुभवले..
- पोलीस खात्यास वेळोवेळी मदत केली व त्यांच्या व्यथा जाणुन घेतल्या.
- पुणे जिल्हा परिषदेच्या शाळेला ३ गुंठे जमीन बक्षीस दिली.(मुलांचे पालकांकडून देण्यात येणारे शिक्षण चांगल्या प्रतीचे नाही अशी तक्रार आहे.)
- शक्य तेथे लाखों रूपये खर्च करून वृक्षारोपण व संवर्धन केले.
- ओशो रजनिशांच्या आध्यात्मिक पुस्तकांची व कॅसेटसची भारतात वयाच्या २८-२९ व्या वर्षी पन्नास पेक्षा जास्त प्रदर्शने आयोजित केली.
- प्रा.शिवाजीराव भोसले, व.पु.काळे, कमलाबाई फडके, शिरीष पै, गोपीनाथराव तळवलकर अशा अनेक थोर साहित्यीकांशी जवळचे संबंध होते.
- फेसबुकवर २०१३ पासून आज पर्यंत अनेक विषयांवर लिखाण करून जगभरातील लोकांच्या लाखों लाईक्स मिळविल्या.
- अनेक मंत्रालयांशी संपर्क, राष्ट्रपती, लोकपाल यांचेशी पत्रव्यवहार करून अनेक नवीन कायदे सुचवून लोकांच्या अडचणी बद्दल लिहिले.
- सध्याचे कायदे व कायदे राबवण्याच्या पध्दती या अत्यंत घातक असल्याचे वेळोवेळी संबंधितांच्या निदर्शनास आणुन दिले व नवीन व्यवस्था व नविन कायदे लिहून पाठवले. राष्ट्रपती कार्यालयाकडून माझी कायदे मंडळावरील नियुक्ती साठी पाठविलेली फाईल केंद्र सरकारच्या कायदे मंत्रालयाकडे प्रलंबित आहे.
- 'अच्छी मानसिकता' हे चार भाषेतील साप्ताहिक २०१४ साली सुरु केले. परंतु सरकारी धोरणांमुळे त्या कामात व्यत्यय आला.
- जमिनीच्या संदर्भात डिस्ट्रीक्ट कोर्ट पुणे, हायकोर्ट मुंबई तसेच दिल्लीच्या कोर्टात अनेक वर्षांपासून हेलपाटे मारले आहेत तसेच जमिनी संदर्भातील मंत्रालया पर्यंतच्या सर्व कार्यालयात हजारो हेलपाटे मारले असून माझे हजारो कोटी रूपयांचे नुकसान झाले आहे त्यांस बहुतांश संबंधित लोक जबाबदार आहेत. माझे वयाची महत्वाची वर्षे व्यर्थ गेली आहेत. त्यामुळे माझे पुस्तक प्रकाशन, साप्ताहिक प्रकाशन, ओशो कम्युन तसेच अनेक प्रकारच्या सामाजिक कार्यास खो बसला आहे.
- जसे माझे जीवन सरकारच्या चुकीच्या निती नियमांमुळे अत्यंत कष्टात, त्रासात, खडतरपणे गेले व माझे अनेक प्रकारे हजारो कोटी रूपयांचे नुकसान झाले आहे. तसे लोकांचे होवू नये म्हणून जीवनासंबंधित अनेक विषयांवर मी 'सुधीर निती' या नांवाने नवीन कायदे सुचवून लवकरच पुस्तक प्रकाशित करण्यास सुरूवात करीत आहे व लोकांना मदतरूप होण्याकरिता ही २०१९ ची विधानसभा निवडणुक लढवावी अशी माझी इच्छा आहे.
- आज लाखो लोकांचे जीवन चिंताग्रस्त व भयावह झाले असून त्यामुळे लोकांना मानसिक विकार होत असून अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत त्यामुळे सामाजिक बांधीलकी म्हणून मी अनेक प्रकारे बरेच काही करू इच्छितो.

## पुण्यातील कोणत्याही मतदार संघासाठी सुध्दा इच्छुक उमेदवार महत्वाच्या राजकीय पक्षांकडून संपर्क व सहकार्याची अपेक्षा !